सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

शिवाजी नगर, पुणे - ४११००५

(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)

फोन नं. ०२०-२५५०७००२/७००९ संकेतस्थळ :www.coeptech.org.in ईमेल : registrar@coeptech.ac.in

जा.क्र.सीओईपीतंवि/सावि/परिपत्रक/२०२५/ 1827 दिनांक :- 17 JUN 2025

परिपत्रक :

विषय : सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा ४ था स्थापना दिन साजरा करणेबाबत.
(दिनांक २१ जून २०२५)

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या ४ थ्या स्थापना दिनानिमित्त शनिवार दिनांक २१.०६.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समोर ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तरी स्थापना दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या समोर सकाळी ०९.५० वाजता उपस्थित रहावे. तसेच संस्थेतील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास गणवेशात उपस्थित रहावे.

उत्सव अथवा औपचारीक प्रसंगी परिधान करावयाचा शासनाने ठरविलेला राष्ट्रीय पोशाख स्थापना दिन समारंभ प्रसंगी उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी परिधान करावा.

कुलसचिव,
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

प्रत- माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

१. संचालक विद्यार्थी विकास मंडळ, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे.
२/- त्यांना कळविण्यात येते कि, ध्वजारोहण समारंभाच्या आयोजन/नियोजनाची संपूर्ण जबाबदारी ही आपली राहील. श्री. गणपत देसाई केंद्रे, विशेष कार्य अधिकारी (OSD) वसतीगृह विभाग व श्री. एल.बी.भोसले, यंत्रपरिचर (यंत्र अभियांत्रिकी विभाग) यांना ध्वजारोहण समारंभ बाबत प्रशिक्षण नियोजन आदी बाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी.
२. विभाग प्रमुख निर्मिती अभियांत्रिकी व औद्योगिक व्यवस्थापन विभाग यांनी ध्वजारोहणाबाबत आवश्यक ती व्यवस्था करावी.
३. डॉ. श्रीमती.एन.आर.कोल्हारे.सहयोगी प्राध्यापक, अणुविद्युत विभाग/उपाध्यक्ष जिमखाना व श्रीमती अमृता एन. देशपांडे, सहाय्यक संचालक शारीरिक शिक्षण, जिमखाना विभाग यांनी वरील कार्यक्रमाच्या वेळी संचलन प्रमुख म्हणून काम पहावे तसेच सदर दिवशी सामुदायिक राष्ट्रगीत/राज्यगीत/विद्यापीठगीत गायनाचा अंतर्भाव असलेला कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. श्री. एल.बी.भोसले, यंत्रपरिचर (यंत्र अभियांत्रिकी विभाग) वसतिगृह आवारातील निवासस्थान यांनी दिनांक २१.०६.२०२५ रोजी उचित कालावधीमध्ये ध्वजरक्षणाचे काम करावे व सूर्यास्तापूर्वी ध्वजावतारणाचे काम पहावे.

५. विभाग प्रमुख जिमखाना विभाग यांनी पूजा साहित्य व प्रसादाची व्यवस्था करावी.

प्रत : माहितीसाठी.

१. मा.कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा.कुलसचिव कार्यालय.

विद्यापीठातील-

३. सर्व अधिष्ठाता.
४. सर्व संचालक.
५. सर्व विभागप्रमुख.
६. सर्व सहयोगी अधिष्ठाता.
७. वित्त व लेखाधिकारी.
८. आहरण व संवितरण अधिकारी.
९. मुख्य कुलमंत्री.
१०. प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी.
११. ग्रंथालय विभाग.
१२. जिमखाना विभाग.
१३. बोटक्लब विभाग.
१४. BWC विभाग.
१५. EWC विभाग.
१६. सोयी सुविधा व्यवस्थापक FM
१७. RILL विभाग
१८. विद्यार्थी / आस्थापना विभाग.
१९. DATA CENTRE विभाग.
२०. परिक्षा विभाग.

उपरोक्त ३ ते २० यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांचे अधिपत्याखालील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे.

२१. सर्व सूचनाफलक, विद्यार्थ्याकरिता